क्र. १५८ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

१५ ऑगस्ट २०२३

## मरियेचे स्वर्गनयन/स्वातंत्र्यदिन

### प्रस्तावना

मरिया मातेचा जन्म म्हणजे देवपित्याला पडलेलं सुंदर स्वप्न. मरियेने देवपित्याच्या आज्ञेला दिलेला होकार म्हणजे मानवी जीवनापुढील आज्ञाधारकपणाचा आदर्श होय.

''मी प्रभूची दासी'' या मरियेच्या उत्तरात केवळ नम्रता नव्हती तर आज्ञाधारकपणाही होता. अगदी उदरापासून कालवरीपर्यंत व थडग्यापासून पुनरूत्थानापर्यंत ती देवपित्याशी आज्ञाधारक राहिली. देवाच्या तारणाच्या प्रवासातून जाताना तिच्या वाट्याला येणारे दु:ख, वेदना, अवहेलना, अपमान ह्या सर्व गोष्टी लाचार होऊन स्वीकारल्या नाहीत तर त्या केवळ देवपित्याशी आज्ञाधारक असल्यामुळेच ती पेलू शकली.

मरियेच्या व्यक्तिमत्त्वात आज्ञाधारकपणा हा गुण उल्लेखनीय होता. तिच्यातील ह्या अप्रतिम गुणामुळे ती मैलाचा दगड पार करु शकली. ह्या दिवशी देवपित्याने तिला स्वर्गात बोलावून घेतले. आजच्या मिस्साबलीदानात सहभागी होत असताना आपण केवळ मरियेची भक्ती न करता तिच्यामधील गुणांची पुजा करावी म्हणून तिच्याकडे विशेष सामर्थ्य व प्रेरणा मागू या.

तसेच आज आपण आपल्या देशाचा ७४ वा स्वतंत्र दिवस साजरा करत आहोत, ह्या देशातील जनतेमधे ऐक्य निर्माण होऊन शांतता पसरावी व आपल्या राजकीय पुढाऱ्यांनी देशाच्या हितासाठी झटावे म्हणून आपण मरिया मातेकडे विनंती करू या.न आपण प्रभूची प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

सर्वसमर्थ व नित्यजिवी परमेश्वरा, तुझ्या पुत्राची माता निष्कलंक कुमारी मरिया हिला तू शरीरासहित स्वर्गात घेतलेस. स्वर्ग आमचे अंतीम निवासस्थान आहे हे आम्ही ध्यानात ठेवावे व मरियेच्या वैभवात सहभाग मिळावा म्हणून आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो...

### पहिले वाचन

**प्रकटीकरण ह्या पुस्तकातून घेतलेले वाचन ११:१९; १२:१-६. १०**

**''एक स्त्री दिसली, ती सूर्यतेज पांघरलेली होती आणि तिच्या पायाखाली चंद्र होता.''**

देवाचे स्वर्गातील मंदिर उघडण्यात आले आणि त्याच्या मंदिरात त्याच्या कराराचा कोश दृष्टीस पडला. नंतर स्वर्गात एक मोठे चिन्ह दृष्टीस पडले ते हे : एक स्त्री दिसली, ती सूर्यतेज पांघरलेली होती आणि तिच्या पायांखाली चंद्र व तिच्या मस्तकावर बारा ताऱ्यांचा मुगूट होता. ती गरोदर होती आणि वेणा देऊन प्रसूतीच्या कष्टांनी ओरडत होती. स्वर्गात दुसरे एक चिन्ह दृष्टीस पडले ते हे : पाहा, एक मोठा अग्निवर्ण अजगर दिसला, त्याला सात डोकी व दहा शिंगे होती आणि त्याच्या डोक्यावर सात मुगूट होते. त्याच्या शेपटाने आकाशातील ताऱ्यांपैकी एक तृतीयांश तारे ओढून काढून ते पृथ्वीवर पाडले. ती स्त्री प्रसूत होईल तेव्हा तिचे मूल खाऊन टाकावे म्हणून तो अजगर त्या प्रसवणाऱ्या स्त्रीपुढे उभा राहिला होता. सर्व राष्ट्रांवर लोखंडी दंडाने राज्य करील असा पुत्र म्हणजे पुत्रसंतान ती प्रसवली, ते तिचे मूल देवाकडे आणि त्याच्या राजासनाकडे वर नेण्यात आले, ती स्त्री रानात पळून गेली, तेथे देवाने तयार केलेले असे तिचे एक ठिकाण आहे. तेव्हा मी स्वर्गात मोठी वाणी ऐकली, ती म्हणाली : ''आता आमच्या देवाने सिध्द केलेले तारण, त्याचे सामर्थ्य व त्याचे राज्य आणि त्याच्या ख्रिस्ताचा अधिकार ही प्रकट झाली आहेत.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**४४:१०-११, १२, १६**

**ओफीरच्या सुवर्णाने मंडित होऊन राणी तुझ्या उजवीकडे उभी आहे.**

१. तुझ्या सन्मान्य स्त्रियांमध्ये राजकन्या आहेत. ओफीरच्या सुवर्णाने मंडित होऊन राणी तुझ्या उजवीकडे उभी आहे. राजकन्ये, इकडे लक्ष दे, कान देऊन ऐक : तू आपले लोक आणि आपल्या बापाचे घर ही विसर.(प्र.)

२. म्हणजे राजा तुझ्या सौंदर्याचा अभिलाषी होईल, तो तुझा पती आहे, म्हणून त्याच्या चरणी लाग. आनंदाने आणि उत्साहाने त्यांस मिरवतील, त्या राजमंदिरात प्रवेश करतील. (प्र.)

### दुसरे वाचन

**संत पौलाने करिंथकरांस पाठवलेल्या पहिल्या पत्रातून घेतलेले वाचन १५:२०-२७**

**''प्रथमफळ ख्रिस्त, नंतर जे ख्रिस्ताचे आहेत ते.''**

ख्रिस्त मेलेल्यातून उठवला गेला आहेच, तो महानिद्रा घेणाऱ्यांतले प्रथमफळ असा आहे. कारण मनुष्याच्याद्वारे मरण आहे, म्हणून मनुष्याच्याद्वारे मेलेल्यांचे पुनरुत्थानही आहे. कारण जसे आदामामध्ये सर्व मस्तक तसे ख्रिस्तामध्ये सर्व जिवंत केले जातील, पण प्रत्येक आपआपल्या क्रमाप्रमाणे, प्रथम ख्रिस्त, मग जे ख्रिस्ताचे ते त्याच्या आगमनकाळी. नंतर शेवट होईल, तेव्हा सर्व अधिपत्य, सर्व अधिकार आणि सामर्थ्यही नष्ट केल्यावर तो देवपित्याकडे राज्य सोपवून देईल. कारण आपल्या पायांखाली सर्व शत्रू ठेवीपर्यंत त्याला राज्य केले पाहिजे. जो शेवटला शत्रू नाहीसा केला जाईल तो मृत्यू होय. ''कारण देवाने सर्व अंकित करून त्याच्या पायांखाली ठेवले.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**आलेलुया, आलेलुया !**

मरिया स्वर्गात घेतली गेली आहे, सर्व दूतांचा गायकवृंद तिचा जयघोष गातात.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**संत लूकच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १:३९-५६**

**''सर्वसमर्थ परमेश्वराने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत, त्याने दीनजनांस उंचावले आहे.''**

मरिया डोंगराळ प्रदेशामधील यहूदातील एका गावास त्वरेने गेली आणि जखऱ्याच्या घरी जाऊन तिने अलशिबेला अभिवादन केले. अलीशिबेने मरियेचे अभिवादन ऐकताच तिच्या उदरातील बाळाने हालचाल केली व अलीशिबा पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाली आणि ती उच्च स्वर काढून मोठ्याने बोलली, ''स्त्रियांमध्ये तू धन्य आणि तुझ्या पोटचे फळ धन्य! माझ्या प्रभूच्या मातेने माझ्याकडे यावे हा मान मला कोठून? पाहा, तुझ्या

अभिवादनाची वाणी माझ्या कानी पडताच माझ्या उदरातील बाळाने उल्हासाने हालचाल केली. जिने विश्वास ठेवला ती धन्य, कारण प्रभूने तिला सांगितलेल्या गोष्टींची पूर्णता होईल.''

तेव्हा मरिया म्हणाली : ''माझा जीव प्रभूला थोर मानतो आणि जो माझा तारणारा त्याच्यामुळे माझा आत्मा उल्हासला आहे, कारण त्याने आपल्या दासीच्या गरीब अवस्थेकडे पाहिले आहे. पाहा, आतापासून सर्व पिढ्या मला धन्य म्हणतील, कारण सर्वसमर्थ परमेश्वराने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत आणि त्याचे नाम पवित्र आहे. जे त्याचे भय धरतात, त्यांच्यावर त्याची दया पिढ्यान्‌पिढ्या असते. त्याने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे, जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने गर्विष्ठ आहेत त्यांची त्याने दाणादाण केली आहे. त्याने अधिपतीस राजासनावरून ओढून काढले आहे आणि दीनजनांस उंचावले आहे, त्याने भुकेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे आणि धनवानांस रिकामे लावून दिले आहे. आपल्या पूर्वजांस त्याने सांगितले त्याप्रमाणे अब्राहाम आणि त्याचे संतान ह्यांच्यावरील दया सर्वकाळ स्मरून त्याने आपला सेवक इस्राएल ह्याला साहाय्य केले आहे. नंतर मरिया सुमारे तीन महिने अलीशिबेजवळ राहून आपल्या घरी परत गेली.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

आपला प्रतिसाद गायनात असेल – **तुझ्या मायेच्या पंखाखाली आश्रय दे मजला आई आश्रय दे मजला.**

१. सेवाकार्यातून ख्रिस्ताचा अनुभव देणारे पोप, बिशप, धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधू यांना प्रेषितीय कार्यात मरियेच्या सेवाभावी जीवनापासून प्रेरणा मिळावी म्हणून आपण मरिया मातेकडे प्रार्थना करू या.
२. खऱ्या सेवेची सुरूवात घरापासून होते. आपल्या घरातील वृद्ध – सासू, सासरे व आईवडील यांची मनोभावे सेवा करण्यास आपणास प्रेरणा मिळावी म्हणून आपण मरिया मातेकडे प्रार्थना करू या.
३. चर्च कार्य हे प्रेषितीय कार्य आहे. हे चर्च आपले आहे, अशी भावना आपल्या मनात राहून त्याचे महत्त्व आपणास पटावे म्हणून आपण मरिया मातेकडे प्रार्थना करू या.
४. समाजकार्यात केवळ विरोधाला – विरोध, माझं तेच खरं ह्या भूमिकेपेक्षा तत्त्वनिष्ठ कार्याचे महत्त्व आपल्याला पटावे म्हणून आपण मरिया मातेकडे प्रार्थना करू या.
५. आज आपण आपल्या देशाचा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत, आपले पंतप्रधान व सर्व नेत्यांनी लोकांच्या हितासाठी कार्य करावे म्हणून आपण मरिया मातेकडे प्रार्थना करू या.
६. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी, आपण मरिया मातेकडे प्रार्थना करू या.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या ह्या सेवासमर्पणाचा स्वीकार कर. तू कुमारी मरियेला स्वर्गराज्यात प्रवेश दिलास. तिच्या प्रार्थनेमुळे तुझ्या दर्शनाची आवड धरण्यास व तुझ्या पायाशी नित्य राहण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, ह्या मुक्तिसंस्काराचा आम्ही स्वीकार केला आहे. कुमारी मरियेच्या प्रार्थनेमुळे स्वराज्यात प्रवेश मिळविण्यास आम्हाला पात्र कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

''ह्या जगातील कोणताही तुरुंग मला बंदिस्त करू शकत नाही कारण मी अंतर्यामी स्वतंत्र आहे'' असे उद्‌गार राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यांनी काढलेले आहे. ख्रिस्तसभा आज पवित्र मरियेच्या स्वर्गनयनाचा सोहळा साजरा करीत असताना आपण आपल्या भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. त्यानिमित्ताने प्रभू ख्रिस्ताने आपल्याला मिळवून दिलेले स्वातंत्र्य, पवित्र मरियेचे स्वातंत्र्य आणि आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य या तीन मुद्यांवर चिंतन करू या.

**१) ख्रिस्ताने मिळवून दिलेले स्वातंत्र्य :** पाप करून माणसाने आपले स्वातंत्र्य गमावले. मोशेकरवी देवाने इस्राएली लोकांना इजिप्तच्या गुलामगिरीतून व पुढे सायरस राजाच्या फर्मानाने यहुदी लोकांना बाबिलोनच्या हद्दपारीतून मुक्तीचा अनुभव दिला. परंतु त्यांचा ओढा पापांच्या बंधनाकडेच होता. संदेष्ट्यांकरवी देवाने त्यांना ह्या त्यांच्या पारतंत्र्याची जाणीव करून दिली. शेवटी पाप त्यांच्या रक्तात भिनल्यामुळे रक्त सांडूनच त्यांना पापमुक्त करण्याची योजना देवाने ख्रिस्ताठायी पूर्णत्वास नेली. आपल्या पृथ्वीवरील जीवनात त्याने अनेकांना दु:ख, आजार, भूत-पिशाच्च सैतान, अपंगत्व, मृत्यू यांपासून मुक्त केले.

**२) पवित्र मरियेचे स्वातंत्र्य :** पवित्र मरियेने अगदी स्वेच्छेने व मोकळ्या मनाने परमेश्वराच्या या योजनेला होकार दिला. आयुष्यभर ती देवाच्या इच्छेनुसार वागत राहिली. बेथलेहेमचा गोठा, इजिप्तमधील पलायन, योसेफच गरिबी, काना येथे येशूने वरकरणी दिलेला नकार इतकेच काय सात दु:खांची तरवार, विशेषत: क्रूसावरील आपल्या पुत्राचा मृत्यू ह्या गोष्टी तिचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकल्या नाहीत. आज तिने गाईलेले स्तोत्रगीत हे राजकीय, सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्याचे क्रांतीगीत म्हणून ओळखले जाते. आजच्या पहिल्या वाचनातील वर्णन जुन्या इस्राएलला व नवीन इस्राएल-ख्रिस्तसभा हिला जितके लागू पडते तितकेच ते पवित्र मरियेलाही लागू पडते. सूर्यतेज पांघरलेली (देवाचे पावित्र्य) बारा ताऱ्यांचा मुकूट (इस्राएलच्या बारा आदिपितरांची व ख्रिस्ताच्या बारा प्रेषितांची राणी), पायांखाली चंद्र असलेली (स्वर्ग व पृथ्वीच्या मधोमध राहून मध्यस्थी करणारी माता) असे तिचे मुक्तचित्र पहिल्या वाचनात रंगविण्यात आलेले आहे.

**३) आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य :** प्रभू येशूने मिळवून दिलेले आंतरिक व आध्यात्मिक स्वातंत्र्य झुगारून देऊन माणूस आज सैतानाच्या पसव्या व पोकळ आश्वासनाला भुलून पापाच्या गुलामगिरीत राहणे पसंत करतो. राजकीय स्वातंत्र्य मिळालेले असताना कायदेकानून मोडून किंवा कायदा हातात घेऊन स्वतंत्र भारताचा नागरिक तुरुंगात खितपत पडतो. सामाजिकदृष्ट्या तो अनिष्ट चालीरिती व रुढीपरंपरांना चिकटून राहतो व बंधनात राहतो. ह्याचे कारण तो अंतर्यामी मुक्त वा स्वतंत्र झालेला नसतो?

**आत्मपरीक्षण :** मला मिळालेल्या राजकीय, सामाजिक व आध्यात्मिक स्वातंत्र्याचा वापर मी कसा करतो? विविध प्रकारच्या पारतंत्र्यात असलेल्या लोकांना मुक्त करण्यासाठी मला काय करता येईल?

•••

| ऑगस्ट २०२२ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम २२ | पवित्र मरीयेचे राणीपद | : २ थेस्सलनी १:१-५, ११-१२/मत्तय २३:१३-२२ |
| मंगळ २३ | लिमाची सं अँथनी रोझ | : २ थेस्सलनी २:१-३,१४-१७/मत्तय २३:२३-२६ |
| बुध २४ | सं बार्थोलोम्यू | : २ थेस्सलनी ३:६-१०, १६-१८/मत्तय २३:२७-३२ |
| गुरु २५ | सं लुईस नववे | : १ करिंथ.१:१-९/मत्तय २४:४२-५१ |
| शुक्र २६ | सं झेफिरिनस | : १ करिंथ.१:१७-२५/मत्तय २५:१-१३ |